**नि.दिवाणी दावा क्र. ६९/२०१८**
सुरेखा वि. शालाबाई व इतर
निशाणी क्रमांक ६८ लगत

**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्रमांक २ नामे अशोक तिपण्णा सुरवसे यांचा उलटतपास वादी यांचे विधीज्ञ श्री. एम. डी. गायकवाड यांचेमार्फत सुरु</u>**

**१.** माझे शिक्षण दुसरीपर्यत झाले आहे. मी शिवकांता गायकवाड, शालाबाई गायकवाड, विठ्ठल मेघना गायकवाड व शिवाजी विठ्ठल गायकवाड यांना ओळखतो. माझे शामराव इनामदार यांचे सोबत नेहमीची बसणे उठणे असल्यामुळे मला वरील लोकांची ओळख आहे. हे म्हणणे खरे आहे की, शामराव इनामदार हे वकील होते व त्यांचे पुष्कराज ज्वेलर्स नावाचे दुकान होते. हे म्हणणे खरे आहे की, शामराव इनामदार हे मुळत: उमरगा येथील रहिवाशी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यांची शेती व दुकान हे उमरगा येथे आहे. शिवकांता, शालाबाई, विठ्ठल व शिवाजी हे सर्व येणेगुर येथील रहिवाशी आहेत. येणेगूर हे उमरगा पासून २५-३० कि.मी. आहे. तसेच गुंजोटी ते येणेगूर मधील अंतर देखील २५-३० कि.मी. आहे. शिवकांता, शालाबाई, विठ्ठल व शिवाजी यांच्यामध्ये काय नाते आहे मी सांगू शकत नाही. माझे शिवकांता, शालाबाई इतर प्रतिवादी यांचे सोबत काहीही नाते नाही. मी न्हावी समाजाचा असून, शामराव इनामदार हे ब्राम्हण असून शिवकांताबाई व प्रतिवादी क्रमांक १ ते ३ हे हरिजन समाजाचे आहेत.
प्रश्न- शामराव व शिवकांताबाई यांच्यामध्ये कोणता व्यवहारा झाला होता
उत्तर- दोघांमध्ये शेतीचा व्यवहार झाला होता.
शामराव व शिवकांता यांच्यामध्ये शेतीबाबत व्यवहार २२-२५ वर्षापुर्वी झाला परंतू मला त्याचा वार व नेमकी तारीख मला सांगत येत नाही.

**२.** वादी सुरेखा यांनी शिवकांता व प्रतिवादी यांना येणेगुरला बोलावून वादग्रस्त मिळकतीचे ठरावपत्र केले किंवा नाही याबाबत मला माहित नाही. वादग्रस्त मिळकतीच्या नोंदणी करते वेळेस माझे सोबत वादी सुरेखा इनामदार, शामराव इनामदार व दुसरा एक साक्षीदार होता त्याचे नाव आठवत नाही. तसेच त्या दिवशी प्रतिवादी देखील हजर होते.

प्रस्तुत दाव्यातील वादग्रस्त मिळकतीच्या नोंदणीकरीता वरील लोकांशिवाय अन्य कोणीही लोक हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी वादग्रस्त मिळकतीच्या खरेदीखत निशाणी क्रमांक ४६ वर साक्षीदार म्हणून सही दस्तलेखकासमोर केली आहे. त्यादिवशी मी एकुण दोन किंवा तीन सहया केल्या होत्या. मी सदर दस्तावर सही ही रजिस्ट्रारसमोर देखील केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दस्तलेखकासमोर केलेली सही मी शिवकांता व प्रतिवादी यांचे सांगणेनुसार केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी रजिस्टार समारे देखील कोणतीही सही केली नाही. आता मला दाखविण्यात आलेल्या निशाणी क्रमांक ४६ वरील खरेदीखतावरील पान क्रमांक ७ वर माझी सही आहे परंतु सदर खरेदीखताच्या पान क्रमांक ८ वर माझी सही नाही.

**३.** शालाबाई यांनी विक्री केलेल्या जमीनीचा सर्वे क्रमांक १४८ असा होता. सर्वे क्रमांक १४८ मधील ०२ हे ०६ आर ही वादीस विक्री केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, रजिस्ट्री ऑफीसर समोर कोणी सही केल्या व पुढे काय झाले हे मला माहित नाही.

**४.** वादग्रस्त मिळकतीचा मी ७/१२ नोंदणी करण्याची दिवशी बघितला होता. त्यावेळेस वादग्रस्त मिळकतीच्या ७/१२ वर किती जणांचे नाव होते हे मला आज रोजी आठवत नाही. वादग्रस्त मिळकतीचा खरेदी दस्त हा पैशाच्या हमीकरीता केला होता याबाबत खरेदीखत करते वेळेस कोणतेही परतीचा दस्त नोंदविला गेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, शिवकांता यांना पैशाची गरज असल्यामुळे शामराव इनामदार यांनी पैसे घेवून वादींच्या नावाने खरेदीखत करुन घेतले हे मी खोटे सांगत आहे. शिवकांता यांना व्याजाने पैसे दिल्याबाबतची कोणतीही लिखापढी माझे समक्ष झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, शिवकांता बाई व शामराव इनामदार यांचे सांगणेवरुन वादीच्या नावाने खरेदी खत करुन दिले हे मी खोटे सांगत आहे.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, शामराव इनामदार हे वादग्रस्त मिळकतीची खरेदी करते वेळेस हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, वादग्रस्त मिळकतीचे खरेदीखत हे मला वाचून दाखविल्यानंतर मी त्यावर सही केली आहे.

६. माझे शपथपत्रातील मजकुर "वास्तविक सुरेखा इनामदार पासून ते ..... प्रत्यक्ष कब्जा सुरेखा इनामदार यांना कधीही दिलेला नाही”इथपर्यत तसेच " शामराव इनामदार यांनी पासुन ते .... परत करावे असे दोघांमध्ये ठरले होते ” याबाबत कोठेही लिखापढी झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, शामराव इनामदार यांनी मला वर नमूद केलेल्या गोष्टी सांगून सही करण्यास सांगितले हे मी खोटे सांगत आहे. “शिवकांताबाई गायकवाड व त्यांची मुलगी शाला बाई यांनी शामराव इनामदार यांना पाच वर्षापुर्वी त्यांच्या दुकानात २ लाख ९० हजार कोणत्या तारखेला, कोणत्या दिवशी व कोणत्या वर्षी दिले हे मी सांगू शकत नाही.

प्रश्न- ०२ लाख ९० हजार दिल्याबाबतची पावती करुन घेतली होती काय

उत्तर- शामराव इनामदार यांनी हे दुस-या दिवशी वादग्रस्त मिळकतीची रजीस्ट्री करुन देतो म्हणाले होते.

शामराव इनामदार यांनी दुस-या दिवशी रजिस्ट्री करुन देतो असे म्हणून रजिस्ट्री करुन दिली नाही, याबाबत शिवकांता, शालाबाई व मी कोठेही तक्रार दाखल केली नाही. मी खरेदी नंतर पासुन आजपर्यत वादग्रस्त जमीनीचा ७/१२ पाहिला नाही.

७. शामराव इनामदार हे मयत आहेत. शिवकांताबाई व शालाबाई या देखील मयत असून त्या कधी वारल्या हे मला माहित नाही. शिवकांताबाई व शालाबाई या वारल्याबाबतची माहिती मला प्रतिवादी क्रमांक ३ शिवाजी यांनी सांगितली. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत दिनांकपासुन ते आजपर्यत वादग्रस्त मिळकतीवर वादी सुरेखा यांचा ताबा आहे. हे मला माहित नाही की, वादी सुरेखाबाई यांनी वादग्रस्त मिळकतीबाबत अकृषीधारणा प्रमाणपत्र घेवून व तसेच त्या जमीनीमध्ये प्लॉट पाडून सदर जमीन विक्री केली किंवा नाही याबाबत मला माहित नाही.

८. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकतीच्या खरेदीखतामध्ये वादीस वादग्रस्त मिळतीचा मालकी व कब्जा दिला असल्याचे नमूद असताना देखील मी वादग्रस्त मिळकतीवर वादीचा मालकी व कब्जा नाही असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे प्रतिज्ञापत्रामध्ये सदर वादग्रस्त मिळकतीचा कोणताही खरेदी-विक्रीचा व्यवहार झाला

नाही व वादीला कब्जा दिला नाही हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्रामध्ये "शिवकांताबाई गायकवाड यांचे नंतर शालाबाई गायकवाड पासुन .... ते शिवाजी विठ्ठल गायकवाड यांचा प्रत्यक्ष कब्जा व ताबा आहे इथपर्यत" सदरची बाब मी खोटी नमूद केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्रामध्ये "शालाबाई जिवंत असेपर्यत गट क्रमांक १४८ मध्ये पासुन ते ....... शिवाजी गायकवाड (कांबळे) हे जमीनीच मेहनत मशागत करतात व हे मी प्रत्यक्ष जायमोक्यावर जावून पाहिले" इथपर्यंत बाबतचा मजुकुर मी खोटा नमूद केला आहे.

**९.** साक्ष देण्यासाठी मला न्यायालयाचे समन्स आले नाही. साक्षीसाठी शिवाजी यांनी न्यायालयामध्ये आणले. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांना विक्री केलेली जमीन हडप करण्याच्या उद्देशाने प्रतिवादी शिवाजी यांचे सांगणेवरुन मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकतीचा खरेदीखतापासून प्रतिवादी यांचा वादग्रस्त मिळकतीवर कोणताही हक्क नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयामध्ये खोटे शपथपत्र दाखल करुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

KAPIL NIVRATTI NIVDANGE

Digitally signed by KAPIL NIVRATTI NIVDANGE
Date: 2026.08.03 17:55:28 +0530

( श्री के.एन. निवडंगे)

दिनांक - ०३/०८/२०२६

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, उमरगा
( न्यायालय क्र.१ )

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Suresh B. Bhingare |
| Court | --- | K N. Nivdange,<br>C.J.J.D. & J.M.F.C. Omerga |
| Date | --- | 03/08/2026 |
| Order signed by the Presiding officer on | –- | 03/08/2026 |
| Order uploaded on | – | 03/08/2026 |